# आरटीई प्रवेशाची यंदा एकच सोडत

## प्रवेशप्रक्रियेस ११ फेब्रुवारीपासून सुरुवात

औरंगाबाद, ता. १८ : बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी यंदा फेब्रुवारीत प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. तसेच, तीन फेऱ्यांऐवजी प्रवेशासाठी एकाच टप्प्यात लॉटरी काढण्यात येणार आहे. त्यासाठी यंदा नवीन नियमावली तयार करण्यात आली असल्याची माहिती शिक्षणाधिकारी सूरजप्रसाद जयस्वाल यांनी दिली.

### गेल्या वर्षी ढिसाळ नियोजन

दरवर्षी आरटीई प्रवेशप्रक्रियेत तीन टप्प्यांत लॉटरी काढण्यात येते. गेल्या वर्षी एकूण चार फेऱ्या घेण्यात आल्या होत्या, त्यामुळे शाळा सुरू झाल्या तरी प्रवेशप्रक्रिया सुरूच होत्या. शिक्षण विभागाच्या या ढिसाळ कारभाराचा फटका सर्वसामान्य पालकांना बसला होता. यामध्ये पालकांना सोयीच्या शाळा न मिळाल्यामुळे बहुसंख्य जागा रिक्तच राहिल्या. त्यामुळे अनेक पालकांनी या प्रवेशाकडे काणाडोळा केला होता.




### ऑनलाइन अर्जप्रक्रिया

यंदा प्रक्रिया ऑनलाइन घेण्यात येणार आहे. मागील वेळी लॉटरीत नाव आले तरी केवळ कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागले होते. येत्या ११ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या आरटीई प्रवेशप्रक्रियेसाठी पालकांना आत्तापासूनच कागदपत्रांची जमवाजमव करून ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रवेशासाठी अगोदर शाळांना उपलब्ध जागांची नोंदणी करावी लागेल. त्यानंतर पालकांना प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

### संभाव्य वेळापत्रक

**२१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी**
शाळांची पडताळणी

**११ ते २९ फेब्रुवारी**
ऑनलाइन नोंदणी

**११ व १२ मार्च**
लॉटरी सोडत

**१६ मार्च ते ३ एप्रिल**
कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेशनिश्चिती

**१३ एप्रिल ते २२ मे**
प्रवेशाच्या याद्या प्रसिद्ध

Today, 9:04 am

# आरटीई प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर

प्रवेशासाठी ३५२ शाळा पात्र होत्या. यंदा त्यात वाढ होणार आहे. राज्यातील इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीच्या प्रवेशासाठी २५ टक्के जागा मागासवर्गीय तसेच अर्थिक दूर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवल्या जातात. या जागांवर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यानुसार मोफत शिक्षण दिले जाते.शाळेपासून १ ते ३ किलो मीटरच्या अंतरावर राहत असलेल्या पालकांच्या पाल्यांना प्रवेशासाठी प्राधान्य दिले जाते. पहिल्या फेरीत एक किलोमीटरच्या आत राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा, त्यानंतर त्यापेक्षा दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार केला जातो. दरम्यान प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यास विलंब होत आहे.

गेली काही वर्षे आरटीई अंतर्गतच्या २५ टक्के राखीव जागा पूर्ण भरण्यात शिक्षण विभागाला सातत्याने अपयश येत आहे. त्यामुळे यंदा तरी प्रवेश प्रक्रिया अचूक आणि वेगवान राबवून जास्तीत जास्त जागा भराव्यात अशी मागणी आरटीई प्रवेशासाठी काम करणाऱ्या संघटनांनी केली आहे.

शाळा स्तरावर ॲलोटमेंट नंतर पालक थेट शाळेत गेल्यानंतर अडचणी निर्माण होतात. त्यामुळे कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी गट शिक्षणाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली कागदपत्रे पडताळणी समिती तयार करण्यात येणार आहे. यामध्ये एक गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी,पालक संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षकांचे प्रतिनिधी, पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी, स्वंयसेवी संघांचे प्रतिनिधी असे प्रत्येकी दोन प्रतिनिधी आणि एक विस्तार शिक्षणाधिकारी अशा एकूण २० सदस्यांची समिती कागदपत्रे पडताळणीचे काम पाहणार आहे.

## असे आहे वेळापत्रक...

- शाळा नोंदणी– २१ जानेवारी ते ६ फेब्रुवारीपर्यंत
- ऑनलाइन अर्ज करणे ११ फेब्रुवारी ते २९ फेब्रुवारी
- पहिली लॉटरी – ११ आणि १२ मार्च
- प्रवेश घेणे – १६ मार्च ते ३ एप्रिल
- प्रतीक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे टप्पा एक – १३ ते १८ एप्रिल
- प्रतिक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे टप्पा दोन – २४ ते २९ एप्रिल
- प्रतिक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे टप्पा तीन ६ ते १२ मे
- प्रतिक्षा यादी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे टप्पा चार १८ ते २२ मे